# प्रसिध्दीपत्रक

## महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (MAHATET) २०२१
## दि. २१ नोव्हेंबर २०२१
## राज्यातील माजी सैनिक, शहीद सैनिक पत्नी व कुटुंबियांना

## शिक्षक पात्रता गुणांच्या टक्केवारीत सूट देणेबाबत.

शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय क्रमांक: बैठक-२०२१/प्र.क्र./१५३/टीएनटी-१ दि.३०जून २०२२ अन्वये राज्यातील माजी सैनिक, शहीद सैनिक पत्नी व कुटुंबियांना शिक्षक पात्रता परीक्षेमध्ये १५ टक्के गुणांची सवलत देण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा अर्ज भरताना माजी सैनिक आरक्षणांतर्गत नोंद घेण्यात आलेली नाही. तसेच नावातील स्पेलिंग बदल व जातसंवर्ग बदल करणेबाबत उमेदवारांकडून निवेदने प्राप्त होत आहेत. उमेदवारांच्या नावातील स्पेलिंग/जात संवर्ग बाबतची दुरुस्ती असल्यास सदरची दुरुस्ती करणेसाठी व माजी सैनिक आरक्षणांतर्गत नोंद करणेकरीता सुविधा https://mahatet.in या संकेत स्थळावरील उमेदवारांच्या Login मध्ये देण्यात आलेली आहे. उमेदवारांनी आपले निवेदन दि.१०/०८/२०२२ पर्यंत देणे आवश्यक आहे. नावातील स्पेलिंग बदल करण्यासाठी एस.एस.सी. प्रमाणपत्र, जात संवर्ग बदल करण्यासाठी जात प्रमाणपत्र, माजी सैनिक आरक्षणाकरीता सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र Upload करणे आवश्यक आहे. यापूर्वी लेखी / ईमेलद्वारे निवेदन दिले असले तरीही उमेदवारांनी पुनश्च: आपले Login मध्ये Update करणे आवश्यक आहे.

मुदती नंतर तसेच अन्य प्रकारे (ईमेल, फोनसंदेश, लेखी पत्र इत्यादी) आलेल्या निवेदनाचा विचार केला जाणार नाही. प्राप्त सर्व दुरुस्त्यांचा विचार करुन परीक्षा नि ाल https://mahatet.in या संकेत स्थळावर जाहीर करण्यात येईल.

(शैलजा दराडे) 2/8/2022

आयुक्त,

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,

पुणे.